पुढारी बुधवार, २२ मे २०२४

## विवेकानंद महाविद्यालय

विवेकानंद कॉलेजचा बारावीचा निकाल ९७.६३ टक्के निकाल लागला. विज्ञान शाखेत मुश्ताक अल्तमाशने ९५ टक्के गुण मिळवून प्रथम पटकावला. ओम माने ९४.८३ गुणांसह द्वितीय, तर अर्चनाकुमारी राम ९२.३३ गुण मिळवत तिसरी आली. वाणिज्य शाखेत खुशी शेवरमनी ९५.३३ गुण मिळवून प्रथम, शुभम पाटील ९३.८३ गुण मिळवून द्वितीय, वैभवी गोंधळीने ९३.०० टक्क्यांसह तिसरा क्रमांक पटकावला. कला शाखेत विवेक लवटे ९०.८३ टक्के गुण मिळवून प्रथम, श्रावणी पाटील ८८.६७ गुण टक्के मिळवून द्वितीय, तर नाझिया नदाफने ८७.६७ टक्के गुण मिळवले. संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्या हस्ते यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

लोकमत
epaper.lokmat.com
कोल्हापूर, बुधवार, दि. २२ मे २०२४

# विवेकानंद महाविद्यालयाचा ९७.६३ टक्के निकाल

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : बारावीच्या परीक्षेत स्वामी विवेकानंद ज्युनिअर कॉलेजचा सरासरी निकाल ९७.६३ टक्के इतका लागला आहे.



खुशी शेवरमणी



अल्तमश उस्ताद



विवेक लवटे

अल्तमाश मुश्ताक उस्ताद याने ९५ टक्के गुण घेऊन विज्ञान शाखेत प्रथम, खुशी प्रेम शेवरमनी हिने ९५.३३ टक्के गुण घेऊन वाणिज्य शाखेत प्रथम तर विवेक कृष्णात लवटे या विद्यार्थ्याने ९०.८३ टक्के गुण मिळवून कला शाखेत प्रथम क्रमांक मिळविला.

या परीक्षेत विवेकानंदच्या ज्युनिअर कॉलेजचे कला शाखेतील २०५ पैकी १७७, वाणिज्य शाखेतील ४१० पैकी ४०४ आणि विज्ञान शाखेतील ८६४ पैकी ८६३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. कला शाखेचा ८६.३४, वाणिंज्य शाखेचा ९८.५३ तर विज्ञान शाखेचा ९९.८८ टक्के निकाल लागला आहे. ओम रमेश माने याने ९४.८३ टक्के गुण मिळवून विज्ञान शाखेत द्वितीय, अर्चनाकुमारी दरोगा राम हिने ९२.३३ टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक पटकावला. वाणिज्य शाखेत शुभम प्रबोध पाटील याने ९३.८३ टक्के गुण मिळवून द्वितीय तर वैभवी अनिल गोंधळीने ९३ टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळविला.

कला शाखेत श्रावणी नंदकुमार पाटील हिने ८८.६७ टक्के गुण मिळवून द्वितीय आणि नाझिया राकेश नदाफ हिने ८७.६८ टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक पटकावला. या विद्यार्थ्यांचे स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे अभयकुमार साळुंखे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी अभिनंदन केले आहे.

सकाळ
कोल्हापूर, बुधवार, २२ मे २०२४

# कामगाराच्या मुलीचे सोनेरी यश



मेहेक मुल्लाणी

चिंचवाडच्या मेहेक इमराण मुल्लाणीने कला शाखेतून ७७. ५० टक्के गुण मिळवले. ती विवेकानंद महाविद्यालयाची विद्यार्थिनी असून, महाविद्यालय सुटल्यावर ती सायंकाळपर्यंत ग्रंथालयात अभ्यास करायची. नियोजनपूर्वक केलेल्या अभ्यासामुळे तिला चांगले गुण मिळवता आले. खासगी शिकवणीला न जाता यश मिळवता येते, हे तिने दाखवून दिले. ती मध्यमवर्गीय कुटुंबातील असून, तिचे वडील इमराण मुल्लाणी गॅरेजमध्ये काम करतात. गांधीनगरमध्ये त्यांचे भाड्याच्या गाळ्यात गॅरेज आहे. तिला दोन बहिणी आहेत. मेहेक म्हणाली, 'विवेकानंदमधून पदवीपर्यंतचे शिक्षण पूर्ण करुन स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करणार आहे. मला अधिकारी व्हायचे असून, कुटुंबीयांचे स्वप्न पूर्ण करायचे आहे. त्यामुळे यापुढेही मला काळजीपूर्वक अभ्यास करून त्या दिशेने मार्गक्रमण करायचे आहे.'